# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 20.01.2011 (का.प.क्र.11) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दिनांक 20 जानेवारी 2011 (का.प.क्र.11) रोजी मा.सभापती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.40 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त,डॉ.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से.,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री.विजय लक्ष्मणराव वाघचौरे
03. स. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री.विकास रतनलाल जैन
05. स. श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
06. स. श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
07. स. सौ.साधना गणेश सुरडकर
08. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
09. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
10. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
11. स. श्री.मधुकर दामोधर सांवत
12. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद
13. स. श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

**विषय क्र. 120 :**

कार्यकारी अभियंता, (स्लम/बीओटी) महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नारेगांव कचरा डेपो ॲप्रोच रस्त्याचे मजबुतीकरण/रूंदीकरण करणे बाबतच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2008-2009 च्या दरसूचिनुसार अंदाजपत्रक र.रू.9,01,509/- चे तयार करण्यात आले होते. या कामाचा खर्च सन 2009-2010 या आर्थिक वर्षातील नारेगांव ट्रेंचिंग ग्राऊंड लँडफिल क्षेत्र विकास कामाच्या बचत रकमेतून करण्यात आलेला असून सदर कामाची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 16.01% कमी दराची मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त झाली असून कार्यादेश दिल्यानंतर रूपये 7,72,241/- चे प्रथम व दरम्यानचे देयक अदा करण्यात आलेले आहे.

नारेगांव कचरा डेपोतील गेट-1 मधील जोड रस्ता, गेट-3 मधील जोड रस्त्याचे खडीकरणाची कामे करण्याची आवश्यकता असल्याचे मा.आयुक्त महोदय, मा.शहर अभियंता यांनी स्थळ पाहणी दरम्यान निर्देश दिलेले असून आवश्यक व वाढीव कामासाठी सुधारीत अं.प. र.रू.16,79,000/- च्या वाढीव अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.प्रस्तावित कामाच्या अंदाजपत्रकीय

दरापेक्षा 16.01% कमी दराने प्राप्त झालेल्या निविदा दरामुळे होणारी बचत विचारात घेऊन निव्वळ वाढ रूपये 5,09,000/- एवढी होत आहे. करिता खडीकरणाचे काम करणे अत्यंत आवश्यक असल्याने व वाढीव अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली असल्याने सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रूपये 16,79,000/- व मुळ मंजुर एजन्सीकडून मंजुर दराने करून घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 120 मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नारेगांव कचरा डेपो ॲप्रोच रस्त्याचे मजबुतीकरण/रूंदीकरण करणे तसेच नारेगांव कचरा डेपोतील गेट-1 मधील जोड रस्ता, गेट-3 मधील जोड रस्त्याचे खडीकरणाची कामे करणेसाठी तयार करण्यांत आलेल्या सुधारीत र.रू.16,79,000/- च्या अंदाजपत्रकास तसेच वाढीव र.रू.5,09,000/- चे काम मुळ मंजुर एजन्सीकडून मंजुर दराने (अं.प. दरापेक्षा16.01% कमी दराने) करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 121 :**

कार्यकारी अभियंता, (स्लम/बीओटी) महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र पोच रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2007-2008 च्या दरसुचिनुसार अंदाजपत्रक रक्कम रू.10,85,950/- चे तयार करण्यात आले होते. या कामाचा खर्च सन 2009-2010 या आर्थिक वर्षात मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटर या लेखा शिर्षकामधुन करण्यात आलेला असून सदर कामाची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.99% कमी दराच्या मे.आर. के. कन्स्ट्रक्शन यांचेकडून मंजुर निविदा दरानुसार मंजुर अंदाजपत्रकाचे मर्यादेत पूर्ण झालेल्या कामाचे देयक अदा करण्यात आलेले आहे.

सदर प्रकल्पाचे व परिसराचे महत्व लक्षात घेऊन आवश्यक व वाढीव कामासाठी सुधारीत अ.प.रक्कम रूपये 15,56,800/- च्या वाढीव अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. प्रस्तावित कामाच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.99% कमी दराने प्राप्त झालेल्या निविदा दरामुळे होणारी बचत विचारात घेऊन निव्वळ वाढ रूपये 1,30,000/- एवढी होत आहे. करिता परिसरातील डांबरीकरणाचे काम करणे अत्यंत आवश्यक असल्याने व वाढीव अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली असल्याने आणि मुळ मंजुर अंदाजपत्रकावरील वाढीव रक्कम रूपये 4,70,850/- खर्चासह सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रूपये 15,56,800/- व मुळ मंजुर एजन्सीकडून मंजूर दराने काम करून घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 121 मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र पोच रस्त्याचे डांबरीकरण करणे व वाढीव कामासाठी तयार करण्यांत आलेल्या सुधारीत रक्कम रूपये 15,56,800/- च्या अंदाजपत्रकास तसेच वाढीव र.रू. 4,70,850/- चे काम मुळ मंजुर एजन्सीकडून मंजूर दराने (अं.प.दरापेक्षा 21.99% कमी दराने) करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 122 :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वार्ड क्र.93 अंतर्गत एम.आय.डी.सी. कॉलनी अंतर्गत रस्त्याची दुरूस्ती करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.16,97,229/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली असून सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तिन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील एक निविदा दर भरून प्राप्त झाली असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गुत्तेदाराचे नाव | निविदा दर (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) |
|---|---|---|
| 01. | मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | 8.86 % कमी दर |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांचे निविदांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.86% कमी असे आहेत.

तरी मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.86% कमी दराचे निविदापत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मधुकर सावंत : किती निविदा आल्यात खुलासा करण्यात यावा.

श्री.जगदिश सिध्द :टेंडर कॉल करण्यात आले होते. त्यात किती टेंडर आले.

श्री.मधुकर सावंत :एकच निवीदा आली म्हणून रिंग झालेली नाही का.

कार्यकारी अभियंता :टेंडर कॉल केले. 3 निवीदा विक्री झाल्या. 1 निविदा भरून आली. 8.86 टक्के कमी दराची निविदा आहे.

श्री.जगदिश सिध्द :दोन टेंडरमध्ये एक निवीदा आली ती बिलोने आलेले आहे ती मंजूर करण्यास हरकत नाही.

मा.सभापती :विषय क्रमांक 122 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.93 अंतर्गत एम.आय.डी.सी. कॉलनी अंतर्गत रस्त्याची दुरूस्ती करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.86% कमी दराचे निविदाधारक मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 123 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.64 श्रेयनगर येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.9,99,290/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 5 निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 5 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

01. श्री.एम.ए.सिद्दीकी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 38.00% जास्त दराने
02. मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 46.00% जास्त दराने
03. मे.मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 46.00% जास्त दराने

04. मे.चारनिया कन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 46.00% जास्त दराने
05. मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 49.99% जास्त दराने

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.एम.ए.सिद्दीकी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 38.00% जास्त दराची होती. सदर प्राप्त दराच्या निविदेतील दराची सा.बां. विभागाच्या सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तुलना केली असता 21.00% जास्त एवढे दर येत आहे. ज्यामूळे सदर कामावर अंदाजपत्रकीय र.रू.9,99,296/- पेक्षा र.रू.2,09,850/- एवढा वाढीव खर्च अपेक्षित आहे. यास मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी श्री.एम.ए.सिद्दीकी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.00% जास्त दराची निविदा एकूण र.रू.12,09,140/- च्या खर्चासह मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

मा.सभापती :ऐनवेळेचे सर्व विषय मंजूर करण्यात येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.64 श्रेयनगर येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.एम.ए.सिद्दीकी यांची अं.प. दरापेक्षा 21.00% जास्त दराच्या निविदेस र.रू.12,09,140/- च्या खर्चासह स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 124 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.64 येथील श्री.चौधरी यांचे घर बापटवाडी ते उत्सव मंगल कार्यालय पर्यंत रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.14,99,200/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 4 निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 3 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

01. मे.मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 45.00% जास्त दराने
02. राजेश्वर कन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 46.00% जास्त दराने
03. श्री.एम.ए.सिद्दीकी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 46.12% जास्त दराने

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 45.00% जास्त दराची होती. सदर प्राप्त दराच्या निविदेतील दराची सा.बां. विभागाच्या सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तुलना केली असता 21.00% जास्त एवढे दर येत आहे. ज्यामूळे सदर कामावर अंदाजपत्रकीय र.रू.14,99,200/- पेक्षा र.रू.3,14,832/- एवढा वाढीव खर्च अपेक्षित आहे. यास मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी मे.मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.00% जास्त दराची निविदा एकूण र.रू.18,14,032/- च्या खर्चासह मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.64 येथील श्री.चौधरी यांचे घर बापटवाडी ते उत्सव मंगल कार्यालय पर्यंत रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची अं.प. दरापेक्षा 21.00% जास्त दराची निविदा स्विकारणेस, र.रू.18,14,032/- च्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 125 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.61 न्यु समर्थनगर येथे विविध ठिकाणी पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.9,49,300/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 4 निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 4 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | मे.मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | 40.00% जास्त दराने |
| 02. | श्री.के.बी.पाथ्रीकर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | 45.00% जास्त दराने |
| 03. | श्री.एम.ए.सिद्दीकी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | 47.00% जास्त दराने |
| 04. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | 47.77% जास्त दराने |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 40.00% जास्त दराची होती. सदर प्राप्त दराच्या निविदेतील दराची सा.बां. विभागाच्या सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तुलना केली असता 20.00% जास्त एवढे दर येत आहे. ज्यामूळे सदर कामावर अंदाजपत्रकीय र.रू.9,49,300/- पेक्षा र.रू.1,89,860/- एवढा वाढीव खर्च अपेक्षित आहे. यास मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी मे.मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20.00% जास्त दराची निविदा एकूण र.रू.11,39,160/-च्या खर्चासह मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.61 न्यु समर्थनगर येथे विविध ठिकाणी पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची अं.प. दरापेक्षा 20.00% जास्त दराची निविदा स्विकारणेस, र.रू.11,39,160/- च्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 126 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.61 येथील पुष्पनगरी डॉ.पारगांवकर ते मारूती मंदिरापर्यंत रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.8,49,050/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 3 निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 3 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | श्री.के.बी.पाथ्रीकर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | 37.45% जास्त दराने |
| 02. | श्री.एम.ए.सिद्दीकी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | 41.00% जास्त दराने |
| 03. | मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | 46.00% जास्त दराने |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.के.बी.पाथ्रीकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 37.45% जास्त दराची होती. सदर प्राप्त दराच्या निविदेतील दराची सा.बां. विभागाच्या सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तुलना केली असता 20.00% जास्त एवढे दर येत आहे. ज्यामूळे सदर कामावर अंदाजपत्रकीय र.रू.8,49,042/- पेक्षा र.रू.1,69,810/- एवढा वाढीव खर्च अपेक्षित आहे. यास मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी मे.श्री.के.बी.पाथ्रीकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20.00% जास्त दराची निविदा एकूण र.रू.10,18,860/-च्या खर्चासह मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.61 येथील पुष्पनगरी डॉ.पारगांवकर ते मारूती मंदिरापर्यंत रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.श्री.के.बी.पाथ्रीकर यांची अं.प. दरापेक्षा 20.00% जास्त दराची निविदा स्विकारणेस, र.रू.10,18,860/- च्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 127 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.61 समर्थनगर (दक्षिण) येथे विविध ठिकाणी पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.8,99,100/-च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 5 निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 5 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ईनिविदा विभागाकडून प्राप्त आहे.त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | मे.आर.के.कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | 44.99% जास्त दराने |
| 02. | मे.मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | 46.00% जास्त दराने |
| 03. | मे.चारनिया कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | 48.00% जास्त दराने |
| 04. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | 48.88% जास्त दराने |
| 05. | मे.ड्रिम-लँड कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | 49.89% जास्त दराने |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 44.99% जास्त दराची होती. सदर प्राप्त दराच्या निविदेतील दराची सा.बां. विभागाच्या सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तुलना केली असता 20.00% जास्त एवढे दर येत आहे. ज्यामूळे सदर कामावर अंदाजपत्रकीय र.रू.8,99,100/- पेक्षा र.रू.1,79,800/- एवढा वाढीव खर्च अपेक्षित आहे. यास मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20.00% जास्त दराची निविदा एकूण र.रू.10,78,800/-च्या खर्चासह मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.61 समर्थनगर (दक्षिण) येथे विविध ठिकाणी पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा20.00% जास्त दराची निविदा स्विकारणेस, र.रू.10,78,800/- च्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 128 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.61 येथे बालाजी अपार्टमेंट ते हर्सुलकर यांचे घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.9,50,000/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 5 निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 4 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | 34.10% जास्त दराने |
| 02. | मे.आर.के.कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | 45.99% जास्त दराने |
| 03. | मे.मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | 47.00% जास्त दराने |
| 04. | श्री.एम.ए.सिद्दीकी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | 47.13% जास्त दराने |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 34.10% जास्त दराची होती. सदर प्राप्त दराच्या निविदेतील दराची सा.बां. विभागाच्या सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तुलना केली असता 21.00% जास्त एवढे दर येत आहे. ज्यामूळे सदर कामावर अंदाजपत्रकीय र.रू.9,50,000/- पेक्षा र.रू.1,99,500/- एवढा वाढीव खर्च अपेक्षित आहे. यास मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.00% जास्त दराची निविदा एकूण र.रू.11,49,500/-च्या खर्चासह मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.61 येथे बालाजी अपार्टमेंट ते हर्सुलकर यांचे घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची अं.प. दरापेक्षा 21.00% जास्त दराची निविदा स्विकारणेस, र.रू.11,49,500/- च्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 129 :**

दिनांक 15/01/2011 रोजी शहर सुधार समितीमध्ये विषय क्रमांक 07 अन्वये मौजे गारखेडा येथील सर्व्हे नं.51/1 नगर भूमापन क्रमांक 15839/1 क्षेत्र 103.20 चौ.मी. रस्त्याने बाधीत जागेचा मोबदला रक्कम रू.2,83,682/- श्रीमती गजराबी शेख उस्मान यांना देण्याचा प्रस्ताव मंजुर करून स्थायी समितीच्या मान्यतेसाठी पाठविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. प्रशासनाचा मुळ प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.

<u>प्रशासनाचा मुळ प्रस्ताव</u>

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, गारखेडा येथील वयोवृध्द महिला श्रीमती गजराबी शेख उस्मान यांनी त्यांची मौजे गारखेडा सर्व्हे नंबर 51/1, नगर भुमापन क्रमांक 15839/1 येथील 103.20 चौ.मी.रस्त्यात गेलेल्या जागेचा मोबदला मिळणे बाबत वारंवार पाठपुरावा करून मावेजा मिळणे बाबत मागणी केली. सबब मा.आयुक्तांनी प्रकरणी समिती नियुक्त करून सदरील प्रकरणी निर्णय घेण्याचे आदेशीत केले. त्यानुसार समिती नियुक्त करण्यात आली सदरील समितीचे अध्यक्ष श्री.एम.डी.सोनवणे (शहर अभियंता)

महानगरपालिका औरंगाबाद सदस्य श्री.डी.पी.कुलकर्णी (सहाय्यक संचालक नगर रचना) महानगरपालिका औरंगाबाद व सदस्य अपर्णा थेटे (विधी सल्लागार) महानगरपालिका औरंगाबाद यांनी दिनांक 04/09/2010 रोजी बैठक बोलावून निर्णय घेतला (सदरील निर्णयाची छायाप्रत सुलभ संदर्भाकरीता सोबत सादर करण्यांत येत आहे.) त्यानुसार संबंधीत वयोवृध्द महिला श्रीमती गजराबी शेख उस्मान यांना द्यावयाचा मावेजा रक्कम रू.2,83,682/- (दोन लाख त्र्यांशी हजार सहाशे ब्यांशी) मा.शहर सुधार समितीचे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक 15/01/2011 रोजी शहर सुधार समितीमधील विषय क्रमांक 07 च्या मंजुरीनुसार मौजे गारखेडा येथील सर्व्हे नं.51/1 नगर भूमापन क्रमांक 15839/1 क्षेत्र 103.20 चौ.मी. रस्त्याने बाधीत जागेचा मोबदला रक्कम रू.2,83,682/- श्रीमती गजराबी शेख उस्मान यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 130 :**

मा.आयुक्त महोदय महानगरपालिका औरंगाबाद यांचे मान्यतेने, उपआयुक्त (सि.) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.77, विठ्ठलनगर एन-2 येथील महानगरपालिकेचे सभागृह (कम्युनिटी सेंटर) भाडे तत्वावर देणे विषयी अध्यक्ष, तान्हाई बहुउद्देशिय सेवाभावी संस्थाने दिनांक 12/10/2010 रोजी अर्ज देवून विनंती केली आहे.

त्यानुसार सदरील सभागृह (कम्युनिटी सेंटर) बांधीव क्षेत्रफळ 262.18 चौ.मी. असून सिध्द शिघ्र गणकानुसार दर रू.220 प्र.चौ.मी./प्रतिमाह प्रमाणे भाडे समितीच्या शिफारशीनुसार मासिकभाडे रू.57680/-प्रतिमाह भाडे आकारणी करून मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवाशुल्क, अकृषी कराचा एक वर्षाचा आगावू भरणा करून घेवून व इतर कर आकारून महानगरपालिकेच्या हक्कात भाडेपट्टा करारनामा करणे योग्य. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : यापुर्वी स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे प्रतिमाह रू.1000/- भाडे आकारण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.77, विठ्ठलनगर एन-2 येथील महानगरपालिकेचे सभागृह (कम्युनिटी सेंटर) तान्हाई बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेस रू.1000/- प्रतिमाहप्रमाणे भाड्याने देण्यास तसेच मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवाशुल्क, अकृषी कराचा एक वर्षाचा आगावू भरणा करून घेवून व इतर कर आकारून महानगरपालिकेच्या हक्कात भाडेपट्टा करारनामा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 131 :**

मा.आयुक्त महोदय महानगरपालिका औरंगाबाद यांचे मंजुरीनुसार, उपआयुक्त (सिडको) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, अध्यक्ष, छत्रपती श्री शाहु टेक्निकल इन्स्टिट्युट ॲन्ड कॉलेज, औरंगाबाद यांच्या संत विश्राम बाबा शाळेसाठी मोहल्ला नंदनवन कॉलनी येथील म.न.पा.चे प्राथमिक शाळेची इमारत भाडेपट्ट्याने देणे बाबत विनंती अर्ज केला आहे. (जे सध्या रिक्त आहे.)

त्यानुसार सदरील शाळेच्या ईमारतीचे क्षेत्रफळ 379.12 चौ.मी.साठी सिध्द शिघ्र गणकानुसार प्रति चौ.मि. प्रतिमाह रू.99/- मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क, अकृषि कराचा एक वर्षाचा आगाऊ भरणा करून घेऊन व मालमत्ता कर आकारून म.न.पा.च्या हक्कात भाडेपट्टा करारनामा करणे योग्य.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : प्रतिमाह रू.5000/- भाडे आकारून देण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला नंदनवन कॉलनी येथील म.न.पा.चे प्राथमिक शाळेची इमारत छत्रपती श्री शाहु टेक्निकल इन्स्टिट्युट ॲन्ड कॉलेज, औरंगाबाद यांच्या संत विश्राम बाबा शाळेसाठी प्रतिमाह रू.5000/- भाडे आकारण्यास व मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क, अकृषि कराचा एक वर्षाचा आगाऊ भरणा करून घेऊन देण्यास व मालमत्ता कर आकारून म.न.पा.च्या हक्कात भाडेपट्टा, करारनामा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 132 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.18 पवननगर अंतर्गत स्वामी समर्थ मंदिर ते एम-2 रस्त्यापर्यंत कॉंक्रीटीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे करीता सा.बां. विभागाचे सन 2008-09 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.19,99,950/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मा.स्थायी समितीकडे सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2010-11 या आर्थिक वर्षातंर्गत नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षातंर्गत उपलब्ध तरतुदीनुसार करण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.19,99,950/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.18 पवननगर अंतर्गत स्वामी समर्थ मंदिर ते एम-2 रस्त्यापर्यंत कॉंक्रीटीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.19,99,950/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 133 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्र.क्र.93 अंतर्गत व्यंकटेश कॉलनी, रचनाकार कॉलनी भागात पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार र.रू.19,88,000/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकास प्राप्त मंजुरीअंती निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 3 निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 3 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे आहे.

1. मे.अरबाज कंस्ट्रक्शन — अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.86% कमी दराने
2. श्री.अब्दुल कदीर शेख रहीम — अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.99% कमी दराने
3. मे.एल.के. कंस्ट्रक्शन — अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.86% कमी दराने

उपरोक्त प्राप्त निविदापैंकी सर्वात कमी दराची निविदा मे.अरबाज कंस्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.86% कमी दराची आहे. सदरील निविदेस 5% अतिरिक्त सुरक्षा रक्कम भरणा करून घेणेच्या अटीवर मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी मे.अरबाज कंस्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.86% कमी दराच्या निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्र.क्र.93 अंतर्गत व्यंकटेश कॉलनी, रचनाकार कॉलनी भागात पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.86% कमी दराचे निविदाधारक मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

**श्री.मधुकर सावंत** :देशात महानगरपालिका संदर्भांत बैंगलोर येथे एक्झीबीशन लागणार आहे. आपण कोणते स्टाल लावणार आहेत. ई-टेंडर लावणार का? आणखी कोणते लावणार व ते पाहण्यासाठी कोण जाणार.

**मा.सभापती** :खुलासा करण्यात यावा.

**उपआयुक्त (महसूल)** :बैंगलोरला राष्ट्रीय पातळीवर देशातील सर्व महानगरपालिका नगरपालिका कामकाजाच्या अनुषंगाने प्रतिष्ठीत असे प्रदर्शन (Exibition) भरणार आहे. हे प्रदर्शन 27 ते 29 जानेवारीला बैंगलोर येथे भरविण्यात येणार आहे. वेगवेगळया महानगरपालिकांमध्ये नविन टेक्नॉलॉजी वापरली जात आहे किंवा ज्या महानगरपालिकांमध्ये अशा स्वरूपाची चांगली कामे केली जात आहे. त्याचे प्रदर्शन लावण्याची मुभा असते. बैगलोर महानगरपालिका यांचे पत्र आलेले आहे. प्रदर्शानात सहभागी होऊ शकतो अथवा स्टॉलही लावु शकतो. महानगरपालिकेचे प्रतिनिधी माहिती घेण्यासाठी त्या ठिकाणी पाठवु शकतो. यावर्षी त्यांनी सॉलिड वेस्ट मॅनेजमेंन्ट, ई-गर्व्हनस्, जीआयएस, पीपीपीचा वापर, असे विषय असुन याबाबतचे माहितीपत्रक प्राप्त झालेले आहे.

**मा.सभापती** :प्रदर्शानात सहभागी होण्याकरीता स्थायी समितीचे तीन सदस्य,स्थायी समिती सभापती, पदाधिकारी आणि चांगल्या प्रकारची माहिती प्राप्त करून घेण्यासाठी मनपाचे दोन अधिकारी यांनी मनपास भविष्यासाठी त्या माहितीचा फायदा होवु शकेल यासाठी प्रदर्शनात सहभागी व्हावे.

**श्री.अमित भुईगळ** :विनंतीने या ठिकाणी सांगण्यात येते की, काल वर्ग चारच्या 14 लोकांना 1124 च्या प्रकरणांत समावेश करून घ्या म्हणुन रुलिंग दिली होती तो भाग बाजुला राहिला परंतु वर्ग चारच्या 122 लोकांना टरमिनेट का करण्यांत येवु नये म्हणून मा.आयुक्त साहेबांनी नोटीस काढलेल्या आहे. 122 घरांचा हा प्रश्न आहे. 122 लोकांचा प्रश्न आहे. विनंती करण्यांत येते की, ज्या काही नोटीसा काढण्यांत आल्या त्या तात्काळ रद्द करण्यांत याव्यात. सर्व वर्ग चारचे कर्मचारी आहेत त्यांचा घराचा प्रश्न आहे. सर्व मागासवर्गीय कर्मचारी आहेत झाडु मारणारे, नाल्या साफकरणारे कर्मचारी आहेत. पोडतिडकीने विनंती करण्यात येते की, ज्या नोटीसा काढण्यांत आलेल्या आहेत त्या तात्काळ रद्द करण्यांत याव्यात.

**मा.सभापती** :स.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यात नोटीसा कशामुळे देण्यात आल्या खुलासा करण्यांत यावा.

**उपआयुक्त (म)** :स.सदस्यांनी जो प्रश्न मांडला वर्ग चारच्या 122 कर्मचाऱ्यांना नोटीसा दिलेल्या आहेत. 1124 ची भरती करण्यात आली होती त्यामध्ये काही

कर्मचाऱ्यांबाबत वयाबाबत टि.सी. नसने, वेगवेगळे कागदपत्र नसणे असा विषय निर्माण झालेला होता. जो चौकशी अहवालाच्या आधारावरती खुलासा मागीतलेला आहे. 03 दिवसांची नोटीस दिलेली आहे.

श्री.अमित भुईगळ :वयाची आणि टि.सी.ची अट शिथील केलेली आहे. त्यामुळे मागण्याचा प्रश्नच येत नाही. सर्विस बुक भरून त्यांना देण्यात यावे. गेल्या 06 वर्षापासून तो प्रश्न पेडींग आहे तो प्रश्न आत्ताच का काढला. नोटीसा देण्याचे कारण काय? मला असे वाटते की, मागासवर्गीय लोकांना टार्गेट केले जात आहे. जेव्हा LAQ झाला होता त्याठिकाणी स्पष्ट म्हणटले होते की, पुढील कार्यवाही काही करणार नाही म्हणून लेखी आलेले आहे. लेखी आलेले आहे की आम्ही काही करणार नाही मग नोटीस का काढण्यांत आल्या.

मा.सभापती :या पुर्वी नोटीस का नाही काढल्या. कर्मचाऱ्यांची दुसरी काही चुक असेल तर जरूर त्यांचेवर ॲक्शन घेण्यात यावी. परंतु विनाकारण ज्या अटी व शर्ती शिथिल करण्यांत आल्या. आता 122 लोकांच्या कुटूंबाचा प्रश्न आहे. याचा विचार करण्यांत यावा. स्थायी समितीला कल्पना देऊन कार्यवाही करायला पाहिजे होती. ज्या नोटीस दिल्यात त्या परत घेण्यात याव्यात.

श्री.रेणुकादास वैद्य :महानगरपालिकेच्या तिजोरीत खडखडात आहे. बेटरमेंट चार्जेसच्या बाबतीत सर्वसाधारण सभेत चर्चा झाली त्याबाबतीत स्थायी समितीमध्ये खुलासा होणे अपेक्षित आहे. कारण याचा परिणाम विकास कामांवर होण्याची शक्यता आहे. सदरचा प्रस्ताव स्थायी समितीमध्ये का आला नाही. उशीर का झाला, कुणामुळे झाला. सदरचा प्रस्ताव कुणी ठेवला होता याबाबतीतचा सविस्तर खुलासा होणे अपेक्षित आहे.

मा.सभापती :सविस्तर खुलासा करण्यात यावा.

सहा.संचालक न.र. : मे जुन 2010 मध्ये सदरील प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 95 खाली स्थायी समितीमध्ये सादर करतांना अंतर्भुत करण्याबाबत मुख्यलेखाधिकारी यांना कळविले आहे. मुख्यलेखाधिकारी यांना अर्थसंकल्प सादर करावा. स्थायी समितीने सर्वसाधारण सभेसमोर साधारण 18.9.2010 च्या सुमारात अर्थसंकल्प सादर केला.

मा.सभापती :मे जुन 2010 मध्ये दरवाढीचा प्रस्ताव कळविण्यात आला असतांना स्थायी समितीसमोर का आला नाही.

मुख्यलेखाधिकारी : मे जुन मध्ये सहाय्यक संचालक नगर रचना यांचेकडुन प्रस्ताव प्राप्त झाला होता. BPMC ACT 99 खाली मुदतवाढ आणि दरवाढीचे प्रस्ताव होता. जे कर,दर लावायचे आहेत त्यास 20फेब्रुवारी मान्यता घेण्याबाबत तरतुद आहे. सदरचा प्रस्ताव हा शुल्कवाढीचा होता. तो नंतर लक्षात आला कर आणि दर असा प्रस्ताव म्हणुन तो ठेवला नाही. त्यामुळे स्थायी समितीमध्ये आला नाही. फेब्रुवारीच्या पुर्वीच मंजूरी घेण्याची तरतुद असल्यामुळे तो ठेवला नाही.

श्री.अमित भुईगळ :या मुळे सर्वसाधारण सभेमध्ये वाद निर्माण झाला. याबाबतची सर्व जबाबदारी प्रशासनावर टाकण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :यापुर्वी बेटरमेंट चार्जेस केव्हा वाढविण्यात आले. वाढ केल्यानंतर जुन्या दराने भरण्याबाबत मुदतवाढ दिली होती काय?

सहा.संचालक न.र. :दि.10.2.1983 रोजी विकास खर्च 18 रूपये प्रति चौ.मि. होता.सन 1989 रोजी दरवाढ करण्यात आली त्यात 41 रूपये वाढ करण्यात आली. त्यावेळेला 14.08.1990 पर्यंत नागरीकांना मुदतवाढ देण्यात आली होती. नागरीकांच्या विनंतीनुसार पुन्हा ती वाढ 31.08.1990 पर्यंत करण्यात आली. सन 1994 साली 70 रूपये प्रति चौरस मि. वाढ करण्यात आली. त्यावेळी 31.10.1994 ची मुदत दिनांक 30.11.1994 पर्यंत वाढविण्यात आली. 2001च्या अर्थसंकल्पात चर्चा होवुन रुपये 100 प्रति चौरस मि. वाढ करण्यात मान्यता देण्यात आली. सन 2003-04 च्या अर्थसंकल्पामध्ये रुपये 140 प्रति चौरस मि. वाढ करण्यात आली.

श्री.रेणुकादास वैद्य :ज्यावेळेस दरवाढ करतो त्यावेळेस नागरीकांना मुदतवाढ देत असतो. त्याचपध्दतीने हयावेळेस मुदतवाढ देण्यात आली. परंतु काही स.सदस्यांनी चुकीचा अर्थ काढुन मा.महापौरांवर आरोप केले. दरवाढ करून नागरीकांच्या सोयीकरीता मुदतवाढ द्यायची ही मनपाची परंपरा चालु आहे. मा.सभापतींनी या विषयाचा सखोल अभ्यास करून निर्णय देण्यात यावा. नागरीकांची गैरसोय होणार आहे.तिजोरीवर याचा विपरीत परिणाम होणार आहे.पैसे जुन्या रेटने घ्यायचे की,नविन रेटने घ्यायचे हा निर्णय मा.सभापती यांनी घ्यावा.

श्री.विकास जैन :आर्थिक वर्ष ज्यावेळेस सुरू होते त्यावेळेसच चालू केले पाहीजे, पाणीपट्टी, मालमत्ता कर व इतर कर वाढ आर्थिक वर्ष सुरू होते त्यावेळेस लागु केले पाहीजे. नागरीकांना 2000 स्के.फुटचे घरबांधणी करतांना बेटरमेंट चार्जेसपोटी एक लाख रूपये भरावे लागणार आहे. सामान्य नागरीकांना परवडणारे चार्जेस ठेवले पाहीजे.

श्री.रेणुकादास वैद्य :3000 स्के.फुट बांधकामास जास्त रेट लावण्यात यावे.

श्री.महेश माळवतकर :सिडको हडकोतील घरांना विकास शुल्क साधारण दोन हजार रूपयांपर्यंत लागत आहे. विकास शुल्क वाढविल्यामुळे दहा हजारांपुढे पोहचलेले आहे. सदरची वाढ ही मोठया प्रमाणात होत आहे एवढया मोठया प्रमाणात वाढ करू नये. यामध्ये काही प्रमाण ठरले पाहीजे वर्गीकरण केले पाहीजे. विकास शुल्काची वाढ 1 एप्रिल पासूनच केले पाहीजे.

श्री.विकास जैन :छोटया घरांना तसेच 4000 स्के.फुट बांधकामास वेगळे दर देता येईल का?

श्री.जगदिश सिध्द :गावठाणमध्ये 3000 स्के.फुट असल्यास 3000 स्के.फुटचे बांधकाम मिळते. यामध्ये बिल्डरांना सुट देण्यात येवु नये. त्यामधे अट घालण्यात यावी की, मनपाच्या आर्किटेकला बांधकाम फ्लॅटचे आहे का घराचे आहे. हे पाहुन वाढून देण्यात यावे.

श्री.विकास जैन :गावठाण, आर वन आहे.

सहा.संचालक न.र. :विकास खर्च हा तेथील ले आउटच्या डेव्हलपमेंटसाठी घेत असतो. रस्ते, ड्रेनेज लाईन प्लॉटच्या एरीयावर त्यास डिफर करणे अवघड आहे. महानगरपालिकेला सन 2008-09 च्या डिएसआरच्या दराप्रमाणे आज 430 प्रति चौ.मि.मध्ये महानगरपालिकेला सुखसुविधा देणे आहे. त्यासाठी हा खर्च येतो. 140 रूपये विकास खर्च करीत होतो. दरवाढीचा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :यास डिफरेशिएट करू शकाल का?

सहा.संचालक न.र. :एरीयावर केल्यावर फरकाची रक्कम महानगरपालिकेला अदा करावी लागेल.

श्री.सुर्यकांत जायभाये :एवढया वर्षानंतर वाढ करीत आहे त्यासाठी काही नियम पाहीजे. त्याचा आढावा घेवुन वाढ झालीच पाहीजे.

श्री.रेणुकादास वैद्य :गेल्या 15 ते 16 वर्षात वाढ केली नाही. आता वाढ केली त्यामुळे ती मोठी वाटत आहे. दरवर्षी दहा ते पाच टक्के वाढवत गेलो असतो तर नागरीकांना त्रास झाला नसता.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :रेडी रेकनरचा जो रेट आहे. प्रत्येक वर्षी एक जानेवारी रोजी वाढवतात. सन 1994 नंतर 2010-11 रोजी दरवाढ सुचविली आहे. शासन रेडी रेकनरच्या रेट नुसार वाढवितो त्याच धर्तीवर विकास शुल्क वाढविण्यात यावे

श्री.रेणुकादास वैद्य :याबाबतीत स्थायी समिती सदस्यांच्या सहया घेवुन सर्वसाधारण सभा बोलविण्यात यावी व निर्णय घ्यावा कारण याचा फटका विकास कामांवर होवु शकतो. रकमेची भरणा करण्याकरीता नागरीक येत आहे. त्यांचेकडून भरणा करून घेण्यात यावा. पैसेच भरणार नाही हा कुठला नियम. यावर निर्णय होणे अपेक्षित आहे.

श्री.विकास जैन :1-4 पासून लागू करावे.

श्री.मधुकर सावंत :सभागृहात खुलासा होणे अपेक्षित आहे. सर्वसाधारण सभेमध्ये जो वाद झाला त्याचे खरे कारण काय होते. कशामुळे तारीख वाढविण्यात आली. परत घेण्यात आली याबाबतीतचा सविस्तर खुलासा व्हावा.

श्री.रेणुकादास वैद्य :चलन देणे बंद केले आहे. ताबडतोब निर्णय घेण्यात यावा नागरीक पैसे भरण्यास तयार आहे. शुध्दीपत्रक बाबत कोणी बोलले का.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

सहा.संचालक न.र. :विकास खर्च हा सन 2004 मधे 140 रूपये होता आता चालू डिएसआरला महानगरपालिकेला नविन सुविधा देण्यासाठी खर्च येतो. या खर्चाशी तुलनाकरून तो प्रस्ताव ठेवलेला आहे. महानगरपालिकेने दिलेल्या बांधकाम परवानगीमध्ये काही टक्के वाढ करण्यात आली तर दंड लावुन रेग्युलाईज होते त्याचा जो फॉर्म्युला आणि दर होते ते सन 1985 ला फिक्स होते तेच वापरत होतो. सन 1985 पासून दरवाढ झालेली नसल्यामुळे चालु डिएसआरला तुलना करून त्याच्यामध्ये वाढ केली. सन 1992 मध्ये लॅन्ड डेव्हलपमेंट चार्जेस लागले. अकृषी एनओसी देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मनपाकडे जे प्रकरण येतात. त्यात डेव्हलपमेंन्ट प्लॅनची तपासणी करून संबधीतांना एनओसी देण्यात येते. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय त्यांना एन ए ची परवानगी देते. त्या परवानगीसाठी जी एनओसी देतो त्यास आत्तापर्यंत चार्ज लावण्यात येत नव्हता. नगर रचना विभागाची मनुष्यबळ त्यासाठी लागत होते. त्यामुळे ॲडमिस्ट्रेटिव्ह कॉस्ट म्हणुन एक रूपया प्रति चौ.मि.अशा प्रकारचा चार्जेस यामध्ये लावलेला आहे. पुर्वी का वाढ झाली नाही याचा खुलासा करू शकत नाही.

मा.सभापती :दि.10.01.2011 हीच तारीख का लावण्यात आली.खुलासा करण्यात यावा.

सहा.संचालक न.र. :मे जुनमध्ये जेव्हा मुदतचे दरवाढीचे प्रस्ताव मा.आयुक्तांच्या मान्यतेने कलम 95 अन्वये मुख्यलेखाधिकारी यांनी स्थायी समितीकडे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सादर करणार होते त्यामध्ये अंतर्भुत करण्यासाठी पाठविले होते. काही कारणाने ते न घेण्यात आल्यामुळे स्थायी समिती सभापती यांनी सर्वसाधारण सभेमध्ये अर्थसंकल्प सादर केला. साधारणतः दिनांक 18.09.2010 सादर केले त्या पुस्तकाची पहाणी करता असे आढळुन आले की, कुठलेही दरवाढीचे प्रस्ताव अंतर्भुत करण्यात आलेले नाही. दिनांक 27.09.2010 रोजी मा.महापौरांना विनंती केली. की अर्थसंकल्पामध्ये अंतर्भुत करण्यात यावे. त्याप्रमाणे अंतर्भुत केले. दिनांक 28.12.2010 रोजी अर्थसंकल्पीय पुस्तीका वितरीत केले. त्यात त्याचा अंतर्भाव होता. स.नागरीकांना दरवाढीची जाणीव होण्यासाठी मुदत देणे आवश्यक आहे. एक तारखेला मान्यता घेवुन दोन तारखेच्या वर्तमानपत्रांमध्ये अशा प्रकारची दरवाढ करण्यात येते आहे आणि जुन्या दराने 10 तारखेपर्यंत ज्यांना भरणा करायची त्यांनी भरणा करावी. 10 तारखेनंतर नविन दराने आकारणी करण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :वर्तमानपत्रास कळविण्यात आले होते त्यात दिनांकात फरक झाला का?

सहा.संचालक न.र. :दरम्यानच्या काळात एका दैनिक वर्तमानपत्रात ही तारीख 10 तारखेच्या ऐवजी 20 तारीख करण्यात आली होती. 20 तारखेपासून नविन दराने आकारणी करण्यात येईल. त्यांनी नजर चुकीने झालेले आहे म्हणुन तसे शुध्दीपत्रक 5 तारखेला काढण्यात आले. 10 तारखेच्या सुमारास काही नागरीकांनी जाणीव करून दिली. मा.महापौरांनी सर्वसाधारण सभेत सांगीतले,मा.महापौरांनी तसे पत्र दिले. त्यास मान्यता घेवुन 14 तारखेला जाहीर प्रगटन देण्यात आले की 21 तारखेपर्यंत करण्यात येते. दिनांक 18 तारखेला सर्वसाधारण सभेत झालेल्या चर्चेनुसार मा.आयुक्तांनी 18 तारखेपर्यंतच मुदत ठेवण्यात आली. 19 तारखेच्या वर्तमानपत्रात ही दरवाढ रद्द करण्यात आली म्हणुन देण्यात आले व 19 तारखेपासून नविन दर आकारण्यात येईल.

मा.सभापती :10-1 च्या पुढे 20 पर्यंत जी मुदतवाढ दिली होती ती चुकीची होती. 18 तारखेला खुलासा छापण्यात आला.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मा.आयुक्तांनी 21 तारखेची 18 तारीख केली.

मा.सभापती :वर्तमानपत्रात चुक झाल्याने नंतर दरवाढ केली. प्रशासनाच्या म्हणण्यानुसार मा.महापौरांचे पत्र आल्यामुळे असे केले. मा.महापौरांच्या पत्रानंतर त्यांना कळविण्यात आले का की, मनपाचे किती नुकसान होणार आहे फायदा होणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :पदाधिकारी असे पत्र देतच असतात असे 100 पत्र दिलेत ते फॉलो केले का?

मा.सभापती :आर्थिक विषय असल्याकारणाने स्थायी समितीमध्ये यायला हवा होता. मा.महापौरानी 10 तारखेला पत्र दिले होते 12 तारखेच्या स्थायी समितीमध्ये विषय यायला हवा होता. 4 दिवस वेळ घालविला बिल्डरांना शोधत होते

का? आमचा आरोप मा.महापौरांवर, पदाधिकारी किंवा प्रशासनावर नाही. 14 तारखेला पत्र येते व 15 तारखेला पैसे जमा होतात हे ठरवुन केले का?

सहा.संचालक न.र. :ठरवुन केलेले नाही. मुदतवाढ नागरीकांना माहीती होण्यासाठी केले आहे.

मा.सभापती :15 तारखेलाच 80 लाख रूपये कसे जाम होतात. 1 कोटी 79 लाखाचे नुकसान महानगरपालिकेचे झालेले आहे त्याची भरपाई कुणी करायची यास जबाबदार कोण सहाय्यक संचालक नगर रचना यांनी तपासुन सांगायला पाहिजे होते की एवढे एवढे नुकसान होणार आहे. मग त्यावेळेस विचार करण्यात आला असता की द्यायची की नाही द्यायची. स.सदस्यांनी सांगीतले की, सामान्य नागरीकांना परवडणार नाही. मग त्यासाठी आम्ही सभागृहामध्ये बैठक कॉल केली असती. 18 तारखेला विषय ठेवला असता तर त्यावर चर्चा झाली असती. मग का केले नाही . तुमची चुक नाही का त्यामध्ये. याचा खुलासा करण्यांत यावा. या सभेचा अध्यक्ष असल्याने मला विचारणा करण्यांत येणार आहे. मा.महापौर त्या सभेचे अध्यक्ष असल्याने त्यांना विचारण्यात आले. व्यक्तीगत कुणाला दोषी नाही. प्रशासनाने खुलासा केला की, मा.महापौरांचे पत्र आहे. आम्हाला याची माहिती नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.महापौर,मा.सभापती पत्र देतात आणि न बघता करणार का?

मा.सभापती :उद्या एखाद्या पदाधिकारी यांनी पत्र दिले की, सदर इमारत नांवावर करा तर नांवावर करणार का?

श्री.रेणुकादास वैद्य :अजुनही हा विषय आपल्याकडे आला नाही. ही दुर्देवाची बाब आहे.
एवढा विषय झाल्यानंतरही स्थायी समितीमध्ये विषय आला नाही.
आम्ही विषय उपस्थित केला म्हणून.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :आजही विषय नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :अजुनही विषय आला नाही. का नाही आला.

मा.सभापती :आर्थिक विषय असल्याने स्थायी समितीत यायला पाहिजे.

श्री.रेणुकादास वैद्य :वाढ करायची नाही करायची, मुदतवाढ द्यायची नाही द्यायची हा
नंतरचा भाग आहे. स्थायी समितीमध्ये यायला पाहिजे.

मा.सभापती :आपल्याला माहिती नव्हते का? हा आर्थिक विषय असल्याने स्थायी समितीमध्ये यायला पाहिजे. असेल तर सांगा नसेल तर नाही म्हणून सांगण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :खुलासा करतांना जबाबदारीने खुलासा करण्यात यांवा. मा.महापौरांनी सांगीतले म्हणून प्रशासनाची बाजू लंगडी आहे. चुका कराल आणि आरोप करून मोकळे होणार हे चालणार नाही.

श्री.महेश माळवतकर :चुकीची तारीख दिली म्हणून स्थायी समितीत आणायची आवश्यकता होती की नाही. 12 तारखेला स्थायी समितीची बैठक झाली त्यावेळेस विषय आणु शकत होता. मुदतवाढ दिल्याने फायदा नुकसान किती होणार.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.आयुक्त साहेबांनी खुलासा करावा की, सदरील विषय स्थायी समितीत का नाही आला स्थायी समितीत येण्याची गरज आहे की नाही. अजुनही हा प्रस्ताव स्थायी समितीसमोर येत नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :ही आर्थिक बाब आहे स्थायी समितीत यायलाच पाहिजे.

श्री.रेणुकादास वैद्य :आर्थिक बाब असल्याकारणाने स्थायी समितीसमोर विषय आला पाहीजे. मा.आयुक्तांनी याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त :कलम 95 अन्वये वार्षिक अंदाज सादर करतांना महानगरपालिकेला होणारे सर्व उत्पन्न व खर्चाचे विवरण प्रशासनामार्फत स्थायी समितीमध्ये ठेवणे आवश्यक आहे. विकास खर्च आणि मनपातर्फे लावण्यात येणारे शुल्क हे उत्पन्न आहे. दरवाढ आहे त्यामुळे वार्षिक अंदाजपत्रक सादर करतांना याचा समावेश आवश्यक आहे. त्यामुळे स्थायी समितीसमोर यायला पाहीजे होते.

मा.सभापती :स्थायी समितीसमोर यायला पाहीजे होते.

श्री.अमित भुईगळ :12 जानेवारी रोजीच्या स्थायी समितीमध्ये विषय यायला पाहीजे होता.

श्री.रेणुकादास वैद्य :उद्यापासून बेटरमेंन्ट चार्जेस कुठल्या दराने भरणा करायची. जुन्या रेट ने की, नव्या रेट ने भरणा करायची. चलन देणे केव्हापासून चालु करणार आहे. सदरचा विषय स्थायी समितीमध्ये येणार आहेत का? खुलासा करण्यात यावा.

श्री.विकास जैन :स्थायी समितीची मंजुरीची आवश्यकता आहे का?

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मा.आयुक्तांनी खुलासा केलेला आहे. स्थायी समितीमध्ये यायलाच हवा.

श्री.रेणुकादास वैद्य :विषय यायला पाहीजे होता परंतु आला नाही. दरवाढ लागू करत असतांना स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे का?

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मंजूरी आवश्यक आहे.

श्री.विकास जैन :कुठल्या दराने घेणार ते स्थायी समिती जे ठरवेल त्याप्रमाणे होईल.

श्री.रेणुकादास वैद्य :आर्थिक बाब आहे स्थायी समितीला विश्वासात घ्यायला हवे.

मा.सभापती :सदरचा विषय आर्थीक विषयाशी संबधीत असुन नागरीकांच्या जिव्हाळयाशी संबधीत आहे.

श्री.विकास जैन :स्थायी समितीची मंजुरीची आवश्यकता आहे किंवा नाही.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा केला आहे की, स्थायी समितीत विषय यायला पाहीजे आवश्यकता आहे. विषय आता यायला पाहीजे होता.

श्री.विकास जैन :सभा तहकूब करण्यात यावी. परत उद्या सभा लावण्यात यावी.

मा.सभापती :प्रशासनास सभागृहाची आवश्यकता वाटत नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :आपला अधिकार आहे. मा.आयुक्तांनी खुलासा केलेला आहे.

मा.सभापती :विकास शुल्क विकास खर्च बाबत दिनांक 10 ते 18 तारखेपर्यंत जुन्या दराने भरणा केलेली आहे ते नविन दराने भरणा करणे, मुदतवाढीमुळे मनपाचे जे नुकसान झाले आहे त्याची जबाबदारी ज्याची चुक त्याची जबाबदारी. तीन दिवसांच्या आत सभागृहात ठेवण्यात यावे. 101.8 कोटी नुकसान चूक झाली.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :प्रशासन मान्य करते का की, 1 कोटी 70 लाखाचे नुकसान झाले आहे.

मा.सभापती :मनपाचे जे नुकसान झाले आहे त्याची सर्वप्रथम भरणा झाली पाहीजे. विकास शुल्क विकास खर्च बाबत दिनांक 10 ते 18 तारखेपर्यंत जुन्या दराने भरणा केलेली आहे ते नविन दराने भरणा करणे, मुदतवाढीमुळे मनपाचे जे नुकसान झाले आहे त्याची जबाबदारी स्विकारावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मा.आयुक्तांची याबाबत काय भुमिका आहे खुलासा करण्यांत यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यांत यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :सदरचा विषय येणार असेल तर दोनदा तहकूब करून दूपारी 4.00 वाजता लावू. उद्या लावू. स्थायी समितीमध्ये विषय येणार आहे का? गरज आहे का?

श्री.अमित भुईगळ :ज्यांनी चुक केली त्यांचे काय करणार आहे.

मा.सभापती :पैसे भरणा करून घेणार आहे. जेवढे नुकसान महापालिकेचे झालेले आहे ज्याच्यामुळे झालेले आहे. त्याच्या कडुन भरून घेणार आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :तोच खुलासा मा.आयुक्तांकडून अपेक्षित आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :स्थायी समितीत विषय येणार असेल तर सभा दोन तास तहकूब करा. उद्या विषय ठेवा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :महानगरपालिकेचे उत्पन्नाचा विषय आहे दहा वेळेस बैठक लावू शकतो.

श्री.रेणुकादास वैद्य :सभा तहकूब करा, यावर गंभिरपणे चर्चा होणे अपेक्षित आहे असे मला वाटते. प्रशासनाला तसे वाटते का? याबाबतीत विचारणा करण्यात यावी. प्रस्ताव देणार असेल तर दोन तास चर्चा करू.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :1 ोटी 89 लाख रूपयांचे नुकसान प्रशासनाने केले आहे. प्रशासनाचे हे मत आहे की, नाही एवढे नुकसान झाले आहे. याचा खुलासा होणे अपेक्षित आहे.

मा.सभापती :सर्वसाधारण सभेत माझा तोच विषय होता. मुदतवाढ दहा दिवसांची 25 दिवसांची द्या परंतु विषय सर्वसाधारण सभेत आला पाहिजे होता. स्थायी समितीत आला पाहिजे होता.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :आपले अभिनंदन आपण लक्ष देऊन एक कोटी 89 लाखाचे नुकसान झाले म्हणून परंतु प्रशासन नुकसान झाले आहे म्हणुन स्विकारते का?

मा.सभापती :खुलासा करण्यांत यावा.

मा.आयुक्त :सहाय्यक संचालक न.र. यांनी खुलासा करावा की, नुकसान झाले आहे किंवा नाही.

मा.सभापती :नुकसान झाले आहे किंवा नाही एवढाच खुलासा करण्यांत यावा.

सहाय्यक संचालक न.र.:मुदतवाढ दिलेली आहे त्यामुळे नुकसान झालेले नाही.

श्री.अमित भुईगळ :सभागृहाची, मा.सभापती, सदस्यांची दिशाभुल करीत आहात.

श्री.रेणुकादास वैद्य :नविन दर लागूच झाले नाही तर नुकसान कसे झाले.

मा.सभापती :सर्वसाधारण सभेत आपणच खुलासा केलेला आहे की नुकसान झालेले आहे. कुठल्या अधिकाऱ्यांच्या दबावाखाली असा खुलासा करीत असाल तर सभागृह तुमच्यावर कार्यवाही करेल. 10 तारखेपर्यंत मुदतवाढ दिली होती. तोपर्यंत 36 लाख रूपये जमा झालेत. जाहीरप्रगटन दिल्यावर एकाच दिवशी 80 लाख रूपये जमा झालेत. नविन दराने पैसे घेतले असते तर 2 कोटी 60 लाख 32 हजार मिळाले असते. जाहीरप्रगटन दिले ते फक्त संबधीत व्यक्तीला समोर ठेवुन देण्यात आले. 80 लाख रूपये जुन्या रेटने जमा होतात. नविन रेटने केले असते तर 2 कोटी 60 लाख 32 हजार रूपये जमा झाले असते. 1 कोटी 89 लाखाचे नुकसान झालेले आहे.

सहा.संचालक न.र. :सर्वसाधारण सभेत हेच सांगीतले की, नविन दराने लागले असते तर एवढे जमा झाले असते.

| | |
|---|---|
| मा.सभापती | :पत्र काढुन मुदतवाढ दिली तर त्यात महानगरपालिकेचे नुकसान झाले. |
| मा.सभापती | :मुदतवाढ देण्याच्यापुर्वी 12 तारखेला स्थायी समितीची बैठक होती. स्थायी समितीमध्ये विषय यायला पाहीजे होता. कुणालाही विचारात न घेता मर्जीने मुदतवाढ दिलेली आहे. सदरील विषय माहिती नसता तर 20 तारखेची 25 तारीख केली असती. |
| सहा.संचालक न.र. | :मे जून 2010 पासून दरवाढीचा प्रयत्न करतो. |
| मा.सभापती | :तुम्ही प्रयत्न करता तुमचे अभिनंदन प्रयत्न करून 10 तारखेला ठेवणे तेही अभिनंदन तुमच्या प्रयत्नाला यश येत नाही. मुदत वाढत चालली आहे. तुम्ही केलेल्या कामाचे फळ मनपास मिळालेले नाही. फायदा होत नाही. अस जर एखादा अधिकारी मेहनत करून इमानदारीने काम करीत असेल मुदतवाढ करून जर त्या अधिकाऱ्याचे मन करीत असेल तर त्या अधिकाऱ्याने मेहनत करून फायदा काय? अस होत असेल तर कुणीही अधिकारी यापुढे असे काम करणार नाही. प्रशासनाने जे मनमानीपध्दतीने मुदतवाढ दिली याला आमचा विरोध आहे. या शहराने 99 नगरसेवक निवडूण दिले त्यांचे पुढे यायला पाहिजे होते. 10 तारखेला तुमच्याकडे मुदतवाढसाठी मुदतवाढीसाठी आले होते. 10 तारखेला संपले होते. 9 तारखेला घ्यायला पाहिजे होते. पुढची मुदतवाढ 20 तारखेपर्यंत देण्यात आली म्हणून. तुम्ही 14 तारखेला कसेकाय म्हणतात 21 तारीख देण्यात आली. याला 100 टक्के प्रशासन जबाबदार आहे. या काळात महानगपालिकेचे जे नुकसान झाले आहे ते प्रशासन भरून काढणार आहे. त्याची भरणा कशी करायची हा प्रशासनाचा प्रश्न आहे. यांनतर त्यामध्ये काही दुरूस्ती सूचवायची करायची असेल तर स्वतंत्र सभा लावण्यात येईल व चार स्थायी समितीच्या सदस्यांची सहया करून सर्वसाधारण सभा कॉल करू. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :प्रशासनाला स्थायी समितीची गरज वाटते का? |
| श्री.विजय वाघचौरे | :प्रशासन कुठला प्रस्ताव पाठवत नाही तर काय करायचे प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यांस सांगण्यात यावे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :स्थायी समितीची बैठक एक दोन दिवसांत लावण्यांत यावी. सदरचा विषय स्थायी समितीत आला पाहिजे. |
| श्री.विजय वाघचौरे | :प्रशासनाला स्थायी समितीमध्ये प्रस्ताव ठेवण्यांस सांगण्यात यावे. |
| श्री.रेणुकादास वाघचौरे | :स्थायी समितीसमोर प्रस्ताव ठेवण्याची गरज आहे किंवा नाही प्रशासनाकडून खुलासा घेण्यात यावा. |
| मा.सभापती | :विषय स्थायी समितीसमोर ठेवण्यांची प्रशासनाला आवश्यकता वाटते का? खुलासा करण्यांत यावा. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :जे दर वाढविण्यांत आले ते कोणत्या अधिकारात वाढविण्यांत आले खुलासा करण्यात यावा. |
| मा.सभापती | :माझाही तोच प्रश्न होता. 12 तारखेला स्थायी समितीची बैठक होती. 14 तारखेला 18 तारखेला सर्वसाधारण सभा होती. याचा असा अर्थ होतो की, दोन्ही सभागृहाची प्रशासनाला आवश्यकता नाही. प्रशासन आपले मनमानी कारभार करीत आहे. |

श्री.विजय वाघचौरे :प्रशासनाला आपले विकास कामे होऊ द्यायचे नाही. महापालिकेची आर्थिक परिस्थिती खराब आहे.

मा.सभापती :आवश्यकता वाटते किंवा नाही खुलासा करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :आवश्यकता नाही. नियमात तरतुद आहे का? सर्वसाधारण सभेने मंजूर केल्यावर स्थायी समितीत. मा.आयुक्त साहेबांनी खुलासा केलेला आहे. स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे. श्री.डि.पी.कुलकर्णी यांना एकटयावर राग काढणे योग्य नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :कुठल्याच अधिकाऱ्यावर आम्ही राग काढत नाही.

मा.सभापती :ज्या अधिकाऱ्यांनी एवढया वर्षानंतर वाढ सूचविली आहे त्यांनाच आज पिंजऱ्यात उभे केले जात आहे. जे दरवाढ करीत नाही त्यांचेबद्दल काही बोलत नाही.

मा.आयुक्त :थोडयावेळापुर्वीच सांगीतले की, हा विषय स्थायी समितीपुढे येणे आवश्यक आहे. तो का नाही आला याचा खुलासा मुख्यलेखाधिकारी आणि सहाय्यक संचालक नगर रचना यांनी केलेला आहे. येणे आवश्यक होते परंतु वेगवेगळया Circumstances तो आला नाही. स.सं.नगर रचना यांनी नव्याने प्रस्ताव महापौरांकडे दिला. मा.महापौरांकडून मंजूर करून एक तारखेपासून लागू केला असे सांगीतले. नुकसान बाबत लिगल बाबत तपासणी एक दोन दिवसांत पाहणार आहे. पण हा आता पुढे वाढीचा कधीपर्यंतची वाढ हा प्रस्ताव स्थायी समितीपुढे पुन्हा ठेवावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :उद्याच ठेवण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :आजच दूपारी 4.00 वाजता ठेवण्यात यावा.

श्री.विजय वाघचौरे :उद्या 12.00 वाजता ठेवण्यात यावा.

मा.सभापती :प्रशासनाला दोन तीन दिवसांचा वेळ देऊ. सोमवारी बैठक ठेवु.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :उद्या 11.00 वाजता सभा घ्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :सोमवारी बैठक ठेवण्यात यावी.

मा.आयुक्त :दोन तीन दिवसांचा कालावधी यासाठी मागतोय स्थायी समितीत प्रस्ताव ठेवला गेला नाही. परंतु 100 अन्वये सर्वसाधारण सभेने मान्यता दिली. मा.महापौरांनी मान्यता दिली. बजेट मान्य करणेचे अधिकार मा.महापौरांना देण्यात आले होते त्यानुषंगाने ती मान्यता झाली आहे. Controvantion च्या संदर्भात थोडासा दोन तीन दिवसांचा कालावधी पाहिजे.

श्री.रेणुकादास वैद्य :सोमवारी बैठक ठेवण्यांत यावी.

श्री.मधुकर सावंत :प्रस्ताव सुधारणा सहीत ठेवण्यांत यावा.

श्री.विजय वाघचौरे :प्रस्ताव तर सोमवारी ठेवणार आहे परंतु शुल्क भरणा नव्याने घेणार आहे की, जुनाच दराने घेणार आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :स्टे देण्यात यावा. तुमचा अधिकार आहे तो पर्यंत स्टे देण्यात यावा. स्थायी समितीचा निर्णय होईपर्यंत स्टे देण्यात यावा.

श्री.विजय वाघचौरे :पुढील स्थायी समिती सभेपर्यंत स्टे देण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :स्थायी समितीच्या मंजूरी शिवाय ठेवता येत नाही.

मा.सभापती :विषय दोन आहे. नविन जे याच्यामध्ये सुधारणा करणार आहे. ती बैठक सोमवारी कॉल करू. या दहा दिवसांमध्ये महापालिककेचे जे नुकसान झाले त्यात कुणालाही माफी नाही. ते वसुल कसे करायचे कुणाकडून करायचे याबाबत चार दिवसात माहिती पाहिजे.

श्री.रेणुकादास वैद्य :विषय पत्रिकेवरील ऐणवेळीचे सर्व विषय अंदाजपत्रकाच्या संदर्भाने निवीदेच्या संदर्भाने असतील ते मंजूर करण्यात यावे.

श्री.अमित भुईगळ :शहराचे मा.खासदार श्री.चंद्रकांत खैरे गेल्या चार वर्षापासून समांतर जलवाहीनीसाठी पाठपुरावा करीत आहे. समांतर जलवाहीनीचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे येत नाही. याचे कारण काय आहे. निधी परत जाण्याची वेळ आलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :स.सदस्य जे म्हणतात त्यास सहमत आहे. मा.खासदारांनी अतिशय मेहनत घेतलेली आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केलेले आहे. आजही अभिनंदन करतो. प्रशासनाने लवकरात लवकर समांतर बाबतची कार्यवाही करण्यात यावी.

श्री.अमित भुईगळ :पैसे लॅप्स होण्याची वेळ आलेली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :2248 प्रॉपर्टीवर मनपाचे नांव नाही असे वर्तमानपत्रात आलेले आहे. आपण पाठपुरावा करीत आहे. 2248 मनपाचे नांव लावण्यात आलेले नाही. क्रांती चौकवरील मनपाची दहा एकर जागा आहे. ती जमीन मनपाच्या नावांवर आहे. तत्कालिन आयुक्तांच्या काळात तीन एकर जमीन ताब्यात घेण्यात आली आहे. उर्वरित सात एकर जमीन ताब्यात घेतलेली आहे. राहीलेली 7 एकर जमीन साधारणत: रेडी रेकनर प्रमाणे 200 कोटींची जमीन मनपाच्या ताब्यात नाही त्याचे पुढे काय झाले. नगरसेवकांचे छोटे मोठे काम करण्यास मनपाची आर्थीक स्थिती चांगली नाही. तीन एकर जमीन ताब्यात घेतली होती त्याबाबत श्री.पानझडे यांनी अहवाल तयार केला होता. मनपाच्या जमीन ताब्यात घेण्यासाठी काहीच कार्यवाही करत नाही.

मा.सभापती :प्रशासनास या कामासाठी वेळ नाही. 122 लोकांना नोटीस देणे, जाहीर प्रगटन देणे, यास वेळ आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :दहा एकर जमीनीपैकी तीन एकर जमीन ताब्यात घेतली. श्री.पानझडे साहेब यांचेकडून खुलासा घेण्यात यावा. त्यांनी प्रकरण हॅन्डल केलेले आहे. मनपाची आर्थीक स्थिती खराब आहे. 1 कोटी 79 लाख बाबत एवढे गंभीर आहे मग 200 कोटीबाबत प्रशासन गंभिर का नाही.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता :स.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याबाबत संबधीत प्रकरणाचा अहवाला पुरताच संबध होता. तीन एकर जमीनीचा ताब्यात घेण्यासाठी नेमणुक करण्यात आली होती तीचा ताबा घेण्यात आलेला आहे. सात एकर जागेवर काही दुकाना,मालमत्ता आहेत माझ्या माहीती प्रमाणे न्यायालयीन प्रकरण सुरू आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :तत्कालिन आयुक्तांनी सदर जागेत कुठल्याही प्रकारची बांधकाम परवानगी देण्यास मनाई केलेली आहे त्यानंतर बांधकाम परवानगी दिलेली आहे का?

खुलासा करण्यात यावा.

श्री.नासेर खान :पोलीस संरक्षणात पैठणगेट ते औरंगपुरा येथील दुकानांचे ओटे तोडण्यात आले. आदेश कुणी दिले. कोटयावधी रूपयांच्या जमीनीकडे लक्ष नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :सदरचा विषय माझ्या वार्डाशी निगडीत असुन मनपाची जागा असुन मनपाकडेच राहायला पाहीजे. श्री.पानझडे यांचे अभिनंदन करायला पाहीजे की, तीन एकर जमीन मनपाच्या ताब्यात घेतली. उर्वरीत सात एकर जमीन ताब्यात घेण्यासाठी सक्षम अधिकारी नियुक्त करण्यात यावे. दुर्देवाने अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. मनपाच्या पॅनेलचे वकील नियुक्त करण्यात यावे. तरच जागा मनपाच्या मालकीच्या राहतील.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :सात बारावर मनपाचे नांव आहे. तत्कालिन आयुक्तांनी पीआर कार्ड बनविण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर कार्यालयाकडुन कुठलीही कार्यवाही झालेली नाही.

मा.सभापती : तज्ञ विधिज्ञांची नियुक्तीची गरज असेल तर, तात्काळ नियुक्ती करण्यात यावी. जागा ताब्यात घेवुन पीआर कार्डवर नांव लावुन घेण्यासाठी एका सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करून त्यांनी प्रयत्न करावेत. ताब्यात असलेली तीन एकर जागेबाबत माहीती देण्यात यावी.

श्री.विकास जैन :उस्मानपुरा ते श्रेयनगर येथे संत एकनाथ रंग मंदिर येथील सर्व गाडया रस्त्यावर उभ्या असतात. संत एकनाथ रंग मंदिरच्या बाजुला पार्कींगची परवानगी दिलेली आहे. त्यात पाणी भरलेले आहे. त्या पार्कींगची काय परिस्थिती आहे व मनपाने काय लिहुन घेतले होते व कशापध्दतीने त्याने दिलेले आहे. मनपाची मालकी असुन कशापध्दतीने केले आहे. नागरीक पार्कींगमुळे परेशान आहे. कराराबाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.विजय वाघचौरे :पार्कींगमध्ये पाणीच पाणी साचलेले असते.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

मालमत्ता अधिकारी :मालमत्ता विभागातर्फे संत एकनाथ रंग मंदिराची पार्कींग केलेली आहे.

मा.आयुक्त :शहर अभियंता यानी खुलासा करावा.

श्री.विकास जैन :नियमाप्रमाणे काम केलेले आहे काय?

सहा.संचालक न.र. :पुढच्या सभेत माहीती देवु.

श्री.रेणुकादास वैद्य :दोन चार वर्षापासून त्या ठिकाणी काम करत आहे विस्तृत प्रमाणात माहिती देण्यात यावी. अधिकारी वर्षानुवर्ष मनपामध्ये काम करत आहे विषयाबद्दलची माहीती आपल्याजवळ पाहीजे.

सहा.संचालक न.र :ही बांधकाम परवानगी माझ्या कालावधीतील नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :संत एकनाथ रंगमंदिराची पश्चिम बाजु आहे. भिंत आहे ती कट करून ती सर्व्हिस लाईन आतमध्ये घेण्यात येईल. ती आतमध्ये घेवुन तीथे ब्लॉक बसविण्यात येतील. ब्लॉक बसवुन ती टु व्हिलरसाठी राहील. रंग मंदिराच्या पुर्वेला कॉम्प्लॅक्स उभे आहे. तेथील अंडरग्राउंडची पार्कींग महानगरपालिकेच्या मालकीची आहे.त्या ठिकाणी फोरव्हिलरची पार्कींग आहे. ब्लॉक बसविले नाही. भिंत झाली नाही. रंग मंदिरात कुठलाही कार्यक्रम असलातर तेथील नागरीकांना पार्कींगचा त्रास होतो. करार करून मनपाने

संबधीत कंत्राटदाराचा फायदा करून दिला. मनपास ज्या सुविधा पाहीजे होत्या त्या मिळालेल्या नाहीत. प्रशासन यावर काय कार्यवाही करणार खुलासा करण्यात यावा.

श्री.विकास जैन :संबधीत व्यक्तीने कंम्पलिशन सर्टिफिकेट घेतले का?

मा.सभापती :स.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबतीत संबधीत विभागाने कंम्पलिशन सर्टिफिकेट दिलेले आहे का? कराराप्रमाणे ज्या गोष्टी करून घेणे आवश्यक होते त्या घेतलेल्या आहेत का.

श्री.विकास जैन :आपल्या नावांचा वापरकरून कमर्शियल व्यवसाय करतात पार्कीगच्या समस्येमुळे वाहतुकीला समस्या निर्माण होत आहे.

श्री.विजय वाघचौरे :पार्कीगमध्ये पाच फुट पाणी भरलेले आहे.

सहा.संचालक न.र. :दिलेल्या अटी शर्तीचे पालन केले नसल्यास त्यांचेवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

श्री.विकास जैन :सदरील इमारतीला ताबडतोब सिल करण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य : नियमात नसल्यास कोणती कार्यवाही करू शकतो.

सहा.संचालक न.र. :वापर बंद करता येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :वापर बंद करण्यात यावा.

मा.सभापती :कंम्पलिशन सर्टिफिकेट नसल्यास वापर बंद करण्यात यावा.

श्री.विकास जैन :यापुर्वी अनेक रूलिंग दिल्यात स.सदस्य श्री.मधुकर सावंत प्रश्न मांडून थकलेत परंतु काहीही कार्यवाही झालेली नाही.

मा.सभापती :मागील बैठकीच्या ॲक्शन पॉईट बाबत आढावा घेण्यात येत आहे. गेल्या बैठकीत रोशनगेट येथील अनाधिकृत इमारतीविरूध्द कार्यवाही केलेली आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती येथील ड्रेनेज लाईन दुरूस्तीबाबत काय कार्यवाही केली खुलासा करण्यात यावा. तसेच ॲक्शन पॉईट 3 मध्ये श्री.नासेर खान व श्री.निमगांवकर यांचे वार्डातील जलवाहीनीचे दुरूस्तीच्या कामाबाबत काय झाले खुलासा करण्यात यावा. रोशनगेट येथील माहीती उपलब्ध झालेली आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती आणि स.सदस्यांच्या वार्डाची माहिती अद्यापपर्यंत आलेली नाही.

कार्य.अभियंता :कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ड्रेनेजची दुरूस्ती कमी रकमेमध्ये होणार नाही. डिस्पोजलचा प्रश्न आहे. 20 लाखाचे टेंडर झालेले आहे. काम झाल्यानंतरच प्रश्न सुटू शकतो.

मा.सभापती :50 लाख रूपये खर्च करणार होतो.

कार्य.अभियंता :बुस्टर स्टेशन उभे करणार होतो.

मा.सभापती :हर्सुल येथे बुस्टर स्टेशनसाठी जागा उपलब्ध नव्हती ती रक्कम इकडे वापरण्यास सांगण्यात आले होते.

कार्य.अभियंता :जागा मिळण्यास अडचणी येत आहेत. आता ठरविण्यात आले की, तेवढया रक्कमेमध्ये ड्रेनेज लाईन टाकुन जिथे लेवल मिळेल त्या ठिकाणी नेउन सोडुन दयावी लागणार आहे.

मा.सभापती :मार्केट कमिटीमध्ये शेतकऱ्यांचा माल येत आहे आणि ते उघडयावर सोडण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| कार्य.अभियंता | :सदरील प्रश्न किचकट स्वरूपाचा झालेला आहे. |
| मा.सभापती | :आवश्यक ती व्यवस्था करण्यात यावी. पुढील बैठकीमध्ये माहिती देण्यात यावी. |
| कार्य.अभियंता | :पुढील बैठकीपर्यंत काम होवु शकणार नाही. |
| मा.सभापती | :कार्यवाही काय करण्यात आली माहिती देण्यात यावी. स.सदस्य श्री.नासेर खान आणि श्री.निमगांवकर यांचे वार्डातील समस्येबाबत माहिती देण्यात यावी. |
| कार्य.अभियंता(ड्रेनेज) | :स.सदस्य श्री.निमगांवकर यांचे वार्डातील घाण पाण्याचा प्रश्न जलवाहीनी दुरूस्त करून सोडविण्यांत आला आहे. |
| शहर अभियंता | :स.सदस्य श्री.नासेर खान यांचे वार्डात जलवाहिनीवरील वॉल्वचा प्रश्न नाही. क्रॉस कनेक्शन करावे अशी त्यांची मागणी आहे. |
| मा.सभापती | :जी मागणी असेल ती पुर्ण करण्यात यावी. |
| शहर अभियंता | :तांत्रिकदृष्टया काही अडचणी आहेत. सध्या काम करणे शक्य नाही. पाण्याचा पुरवठा सिमीत आहे दुसऱ्या वार्डावर त्याचा परिणाम होईल. |
| मा.सभापती | :मनपाचे सभागृह सेवाभावी संस्थेला भाडयाने देणेबाबत नाममात्र शुल्क 1000 रूपये घेऊन भाडयाने देणे संबधी झाले का? मनपाचे सभागृहाची जी दुरावस्था होती त्यास नाममात्र दराने देणार आहे त्याबाबत काही कार्यवाही झाली का? जे ठराव मंजूर झालेले आहे ते आलेत का? |
| मालमत्ता अधिकारी | :नाममात्र दराने देण्याबाबत हजार रूपये ठरलेले होते. तसा ठराव आहे त्या ठरावाला जेव्हापर्यंत प्रशासकीय मान्यता मिळत नाही. तेव्हा पर्यंत आम्हाला आर.आर.नुसार भाडे वगैरे फाईलमध्ये नमुद करावेच लागेल. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :प्रशासकीय मान्यता झालेली आहे. |
| मा.सभापती | :ज्या ज्या ठरावाला प्रशासकीय मान्यता झालेली आहे आणि भाडे समितीकडून शिफारस करून आल्यानंतर समजा सभागृहाचे 40000 रूपये भाडे आले आणि त्या सभागृहाला कुणी हजार रूपयांनी कुणी घेणार नसेल सभागृहातील दारे खिडक्या पंखे चोरी होऊन घेऊन जात असेल तेथीलच संस्थेला नागरीकांच्या उपयोगी पडण्यासाठी कामी येत असेल हजार रूपये नाममात्र दराने देणार असेल तर त्यामध्ये काय वावगे आहे. |
| मालमत्ता अधिकारी | :देण्याबाबत काही नाही. |
| मा.सभापती | :जे ठराव अशे आले असतील सभागृहाने जे निर्णय घेतला असेल त्याचे पालन झाले पाहिजे आणि सभागृह भाडयाने दिले पाहिजे. |
| मालमत्ता अधिकारी | :सन 2009 चा ठराव आहे. त्यास मान्यता |
| मा.सभापती | :सिटी प्राईडचा जे लागत आहे ते सुध्दा त्यांचे भाडयाने तीन वर्षासाठी देण्यात यावे. |
| मालमत्ता अधिकारी | :नियमानुसार भाडयाने. |
| मा.सभापती | :नियमानुसार भाडयाने. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :हयाच विषयाच्या अनुषंगाने आजच्या वर्तमानपत्रात स्थायी समितीने एक जागा मंजूर केलेली आहे. एन- 4 येथे श्री.परदेशी साहेबांच्या शिफारशीवरून परंतु 2010 मध्ये सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर केलेला आहे. कलावती |

महिला मंडळाला देण्यात आलेले आहे. तो ठराव पुन्हा आलेला आहे तो रद्द करण्यात यावा.

मा.सभापती :इतर विषयामध्ये जी चौकशी समिती नेमली आहे. त्या संदर्भात सदस्यांना कळविण्यात आले आहे काय?

श्री.रेणुकादास वैद्य :आरसीएच बाबत काय झाले.

मुख्य लेखापरिक्षक :67 (3)(क) आणि 5 (2)(2) मध्ये एकुण 158 संचिका आलेल्या आहेत. प्राथमिक छाननी चालू आहे. प्राथमिक छाननी झाल्यावर कमिटी मधील स.सदस्यांना सांगण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :सर्व संचिका प्राप्त झालेल्या आहेत का?

मुख्य लेखापरिक्षक :सर्व संचिका प्राप्त झालेल्या नाहीत.

मा.सभापती :संबधीत अधिकाऱ्यांना सहकार्य करण्यासाठी आवश्यक ती मदत करण्यात यावी. स.सदस्य श्री.अमित भुईगळ यांचे वार्डातील ड्रेनेजचा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यात यावा. AMT संदर्भात निवीदा काढण्याचे आदेश दिले होते त्या संदर्भात काय कार्यवाही केली याचा खुलासा पुढील बैठकीत देण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मागील 2 वर्षापासून वारंवार मागणी करत आहे. गुन्हा दाखल झालेला आहे काय इमारत तोडण्यात आलेली आहे काय? अशा लोकांना प्रशासन वारंवार का संधी देत आहे. आदेश दिल्यावर सुध्दा गुन्हा दाखल झाला नाही. पत्र देवुन मोकळे होतात.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी स.सदस्यांनी विषय उपस्थित केला होता त्या संदर्भात जी माहिती दिलेली आहे. त्या माहिती संदर्भामध्ये योग्य ती कार्यवाही करा म्हणुन कळविण्यात आलेले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ओटे तोडण्यास 100 पोलीस. परंतु महानगरपालिकेच्या जागेवर चार मजली इमारत उभी राहिली आहे त्यांचे विरूध्द काहीही कार्यवाही होत नाही. हा कुठला न्याय आहे. ADTP चा अहवाल आलेला आहे.

मा.सभापती :विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मागील बैठकीत आपण गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिलेले आहे. गुन्हा दाखल झाला का? आणि इमारत पाडली का हे दोनच प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :ADTP यांनी खुलासा करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :आदेश दिल्यानंतर प्रशासन आदेश पाळत नाही. माझी काही चुक असेल तर फाशीला लावा मला. फाशीला लावा राजीनामा देतो, तंग झालो आहे. आता फाशीला लावा. महानगरपालिकेच्या जागेवर चार मजली इमारत उभी राहिलेली आहे. आजच्या सभेत येऊ नये म्हणुन प्रयत्न झाले. आता कार्यवाही झाली नाही तर आयुक्तांच्या गेटवर जावुन पेट्रोल टाकुन जाळुन घेईल. यावरही गुन्हा दाखल करण्यात यावे.

मा.सभापती :असे काही करण्यात येवु नये.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :करणार निश्चित करणार. कोणी कुणाला घाबरत नाही.

सहा.संचालक न.र. :दिनांक 14.01.2011 रोजी पोलीस निरीक्षक,सिटी चौक पोलीस स्टेशन येथे बांधकाम परवानगी बाबत बनावट कागदपत्र तयार करणे,बनावट कागदपत्राचा वापर करून सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग 2 वर्ग औरंगाबाद 6 यांचेकडे डिक्लेरिशन डिड करून कार्यालयाची फसवणुक करणेबाबत गुन्हा दाखल करणेसंबधी पत्र दिलेले आहे. दि.17.01.2011 रोजी गुन्हा दाखल करण्यासाठी पत्र घेतलेले आहे. चौकशी करून गुन्हा दाखल करू असे सांगीतलेले आहे.

मा.सभापती :17 तारखेनंतर आज 23 तारीख आहे त्याचे काय झाले.

सहा.संचालक न.र. :अद्यापपर्यंत गुन्हा दाखल झालेला नाही.

मा.सभापती :संबधीत पोलीस स्टेशन गुन्हा दाखल करून घेत नसेल तर सिपी ऑफिस येथे जावुन गुन्हा दाखल करावा.

याच बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद